जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १५७ दिनांक - ०३/०३/२०२४**

हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## एकाच दिवशी हडपसर पोलीस स्टेशन येथे खुनाचा प्रयत्न व चंदननगर पोलीस स्टेशन येथे खुनाचा गुन्हा करणा-या आरोपीस १२ तासाचे आत केले जेरबंद

दि.०१.०३.२०२४ रोजी जखमी यांना आरोपी नामे शुभम निचळ याने जुन्या वादाच्या कारणावरून धारधार शस्त्राने गळ्यावर वार करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने त्याबाबत हडपसर पोलीस ठाणे गु.र.नं.३८७/२०२४ भा.द.वि.कलम ३०७,३२६ सह भारतीय हत्यार कायदा कलम ४,२५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. गुन्ह्यचा तपास सहा.पोलीस निरीक्षक बर्गे हे करीत आहेत.

दाखल गुन्ह्यातील पाहीजे आरोपीचा शोध घेण्याच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संतोष पांढरे यांनी दिलेल्या सुचनांवरून हडपसर पोलीस स्टेशन तपासपथक अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक अर्जुन कुदळे, पोलीस अंमलदार अतुल पंधरकर,अमोल दणके असे मिळुन आरोपींचा शोध घेत असताना, मिळालेल्या बातमीचे आधारे आरोपी **शुभम काकासाहेब निचळ,वय २७ वर्ष,रा.समर्थ बैठक हॉल समोर,होळकरवाडी,पुणे** यास हांडेवाडी परिसरातुन ताब्यात घेण्यात आले.

आरोपीस ताब्यात घेवून त्याचेकडे गुन्ह्याचे अनुषंगाने तपास करीत असताना त्याने सुरवातील उडवा-उडवीची उत्तरे दिली. त्याचेकडे कौशल्यपुर्वक विचारपुस केली असता, त्याने हडपसर पोलीस ठाणे येथील वरिल नमुद गुन्ह्यासह काल दिनांक ०१.०३.२०२४ रोजी दुपारच्या सुमारास रिव्हरडेल सोसायटी जवळ, खराडी येथे त्याच्या ओळखीच्या इसम बाळु कांबळे यास धारदार शस्त्राने मारून खुन केलेला असल्याचे सांगीतले. आरोपीने सांगितलेल्या माहीतीवरून चंदननगर पोलीस स्टेशन येथून माहीती घेतली असता सदर बाबत चंदननगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१०६/२०२४ भा.दं.वि.कलम ३०२ अन्वये गुन्हा नोंद असल्याचे व त्यातील संशयीताच्या सीसीटीव्ही फुटेज मध्ये नमुद आरोपी दिसत असल्याचे समजले.आरोपीकडे केले एकंदरीत तपासा दरम्यान १)हडपसर पोलीस ठाणे गु.र.नं ३८७/२०२४ भा.द.वि.कलम ३०७,३२६ सह भारतीय हत्यार कायदा कलम ४,२५ २)चंदननगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१०६/२०२४ भा.दं.वि.कलम ३०२ असे गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे श्री.मनोज पाटील मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ५ श्री.आर राजा,मा.सहा. पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे श्रीमती अश्विनी राख,हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संतोष पांढरे यांचे मागदर्शनाखाली व सुचनाप्रमाणे पोलिस निरीक्षक,गुन्हे श्री.पंडीत रेजितवाड तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक अर्जुन कुदळे, पोलीस उप निरीक्षक महेश कवळे,पोलीस अंमलदार,सुशील लोणकर,संदीप राठोड,सचिन जाधव,प्रशांत दुधाळ,निखील पवार,प्रशांत टोणपे,अतुल पंधरकर,सचिन गोरखे,अमोल दणके,चंद्रकांत रेजीतवाड,अमित साखरे,कुंडलीक केसकर,रामदास जाधव,यांनी केलेली आहे.